सहकारी गृह निर्माण संस्थावर प्रशासक नियुक्त करतांना निवृत्त शासकीय अधिकाऱ्याची / कर्मचाऱ्याची नेमणुक करण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत.

महाराष्ट्र शासन,
शासन परिपत्रक क्रमांक- सगृयो २००४/प्रक्र -४४७/१४-स
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ ऑक्टोबर, २००६

वाचा :-

१) शासन निर्णय,सहकार व वस्त्रोद्योग विभाग- क्र. सगृयो १४०१/१८८७३/प्र.क्र. ३०/१४-स दिनांक ९/१०/२००१.

**शासन परिपत्रक :-**

सहकारी गृह निर्माण संस्थावर प्रशासक नियुक्त करतांना निवृत्त शासकीय अधिकाऱ्याची / कर्मचाऱ्याची नेमणुक करण्याबाबत संदर्भाधिन दिनांक ९/१०/२००१ शासन निर्णयान्वये सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु शासनांच्या असे निदर्शनास आले आहे की, उक्त शासन निर्णयाची काटेकारपणे अंमलबजावणी होत नाही व बऱ्याच सहकारी गृह निर्माण संस्थांवर सहकार कायदा, त्याखालील नियम व सहकारी गृह निर्माण संस्थांचे उपविधी यांचे विशेष ज्ञान नसलेल्या किंवा अननुभवी व्यक्तींची प्रशासक म्हणून नेमणुक केली जाते. त्यामुळे शासनाकडे प्रशासकांविरुध्द मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होतात व प्रशासकीय कालावधीत आवश्यक ते काम पूर्ण होत नाही. अशा प्रकारची परिस्थिती उद्‌भवू नये व संस्थांचे प्रशासकीय कामकाज योग्यरितीने व्हावे म्हणून संदर्भाधिन शासन निर्णयाची काटेकारपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना सदर परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

२. तसेच ज्याप्रमाणे समिती सदस्य निवडून आल्यानंतर त्यांच्याकडून क्षतिपूर्ती बंधपत्र घेण्यात येते त्याप्रमाणे प्रशासकांकडूनही बंधपत्र घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. प्रशासकाने / प्रशासकीय मंडळाने त्यांना नेमून दिलेले कामकाज तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे आवश्यक राहील. मात्र संस्थेसाठीचे मोठ्या आर्थिक खर्चाचे निर्णय अथवा महत्वाचे निर्णय संस्थेच्या सभासदांनी घेणे योग्य होईल. Indemnity Bond

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जे. पी. डांगे )
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,

प्रत अग्रेषित, :-

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन)
३) सर्व विभागीय सहनिबंधक (लेखा परिक्षण), सहकारी संस्था.
४) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
५) निवड संग्रह १४-स.